# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **25/07/2022**

**Brief of the work done :-**

मालेगाव येथील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका नराधमास अटक.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एकास अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगांव** ■ शहरातील अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली . मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

मालेगाव शहरातील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय महिलेने मालेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ती मजुरी करून स्वतःचा व मुलींचा उदरनिर्वाह करते. त्यांच्या मोठ्या मुलीचे लग्न झाले आहे.आता त्यांच्या तीन मुली त्यांच्यासोबत राहतात. आरोपी हा त्यांच्या जातीचा असून तो काही काळापूर्वी त्यांच्या घरासमोर आई-वडिलांसोबत राहत होता म्हणून ओळखीचा आहे.२३ जुलै रोजी तक्रारदार महिला कामानिमित्त वाशिम येथे गेली होती. तेथून दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास परत आल्यानंतर त्यांच्या मुलीने सांगितले की, तीन वाजण्याच्या सुमारास गोलू उर्फ गोपाल विलास आंधळे राहणार खेर्डी हा पांढऱ्या रंगाची कार घेऊन आला व फिर्यादी महिलेच्या अंगणात कार उभी केली. त्यावेळी महिलेची एक मुलगी भांडी धुत होती तर दोन लहान मुली खेळण्यात मग्न होत्या. गोलूने महिलेबाबत विचारणा केली असता मुलीने ती वाशिमला गेल्याचे सांगितले. त्यानंतर गोलूने पिण्यासाठी पाणी मागितले. मुलगी पाणी आणण्यासाठी घरात गेली असता गोलू हाही तिच्या पाठोपाठ घरात आला आणि चुकीच्या उद्देशाने तिचा विनयभंग केला. मुलीने आरडाओरडा केल्यामुळे तिच्या दोन लहान बहिणी घरात आल्या त्यांना पाहून आरोपी गोलू उर्फ गोपाल आंधळे तेथून पळून गेला. यासंबंधीच्या तक्रारीवरून मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०२/२०२२ नोंदवून भादवी कलम ३५४, ४५२, ३५४ (अ) सह बाल लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याच्या कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक तानाजी गव्हाणे करीत आहेत.(श.प्र.)